# वेदोक्त प्रकरणात राजर्षी शाहू महाराज यांची भूमिका

**प्रा.ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर**
सहाय्यक प्राध्यापक
कला, वाणिज्य व विज्ञान महविद्यालय,
सोनई, ता. नेवासा जि.अहमदनगर.
मो. ९९६०९५०२३६
इमेल : dnypadar@rediffmail.com

युरोपमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरु झाली आणि अंधारात खितपत पडलेले युरोप आज संपूर्ण जगात झगमगताना दिसते. तशाच पद्धतीने भारतीय समाज देखील अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, प्रथा यात खितपत पडलेला होता. त्यात सुधारणा करण्याचे काम केले ते म्हणजे भारतीय समाज सुधारकांनी. भारतात अनेक समाज सुधारकांचा उदय झाला. आणी एक प्रकारे समाज प्रबोधनाची चळवळ सुरु करून अंधारात खितपत पडलेल्या भारतीय समाजाला प्रकाशात आणण्याचे काम त्यांनी केले. संपूर्ण भारतातील समाज सुधारकांचे काम नेत्रदीपक होते. त्यात महाराष्ट्रातील समाज सुधारक देखील आघाडीवर होते. त्यातील एक महत्वाचे नाव घेतले जाते ते म्हणजे कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांचे. त्यांनी वयाच्या २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी राज्याभिषेकानंतर राज्यकारभाराची सूत्रे हाती घेताच आपल्या पहिल्याच जाहीरनाम्यात कल्याणकारी राज्यकारभाराची ग्वाही देणारा आपला मनोदय स्पष्ट केला होता. त्यांनी भारतीय नवसमाज निर्मितीच्या कार्यासोबतच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय, कृषी, जलनीती, अस्पृश्यता निवारण यासारख्या समाजातील वेगवेगळ्या घटकांना स्पर्श करून त्यावर योग्य असे निर्णय घेण्याचा प्रयत्न देखील केलेला पहावयास मिळतो. त्यावेळी असे निर्णय घेणे एक संस्थानाचा राजा म्हणून देखील ते शक्य नव्हते कारण प्राचीन कालखंडापासून चालत आलेल्या आणि तत्कालीन चालू असलेल्या रूढी, प्रथा आणि परंपरा. ब्राम्हणी वर्चस्व, वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्था या बाबतीत शाहू महाराजांनी केवळ बोलघेवड्या प्रकारची भूमिका न घेता प्रत्यक्षात कृतीची भूमिका घेतलेली पाहायला मिळते. राजर्षी शाहू महाराजांनी जाती व्यवस्थेवर आधारित असलेल्या विषमते विरुद्ध त्यांनी कायदे केले आणि प्रचलित व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम केले. हिंदू, क्षत्रिय यासारख्या शब्दांचा साधा, सरळ आणि सोपा अर्थ असून देखील ब्राम्हणांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्याला पाहिजे तसा त्याचा अर्थ लावून हिंदुच्या माथ्यावर वेदोक्त आणि पुराणोक्त असे दोन वेगवेगळे विधी दोन वेगवेगळ्या वर्णासाठी लादल्याचे पहावयास मिळते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राजर्षी शाहू महाराज यांना व्यक्तिगत जीवनात व सामाजिक सुधारणा चळवळीत आलेल्या ब्राम्हणी वर्चस्वाचा अभ्यास आणि घडलेल्या वेदोक्त प्रकरणात राजर्षी शाहू महाराज यांनी घेतलेली भूमिका यांचा अभ्यास करणार आहोत.

वेदोक्त प्रकरण हे राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनात तसेच आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीत महत्वाचे आहे. तसे पाहता वेदोक्त प्रकरणाचे मुळ हिंदुच्या वर्ण व्यवस्थेवर आधारित असणाऱ्या समाज रचनेत पहावयास मिळते. आर्य श्रेष्ठ आहे. अनार्य कनिष्ठ आहे. वेदपठनाचा अधिकार फक्त आर्यानाच आहे. 'वेद हे हिंदूचे सर्वश्रेष्ठ धर्मग्रंथ ते ग्रंथ मानवनिर्मित नसून ते अपौरुषेय आहे.'' हा समज ब्राम्हणांनी निर्माण करून ठेवला होता. वेदातील मंत्राप्रमाणे पूजा, धार्मिक विधी, धार्मिक संस्कार केले जातात त्यांना वेदोक्त असे म्हणतात. हे वेदोक्त मंत्र केवळ क्षत्रिय यांच्यासाठीच म्हंटले जात असे. प्रमाणबुद्वी ''वैदषु साधना नामनेकता'' या वेदातील वाक्याचा अर्थ सांगताना असे म्हंटले जाते कि ''जो वेद प्रमाण मानतो तो हिंदू म्हणजेच हिंदू'' या शब्दाचा साधा सरळ अर्थ ब्राम्हणांनी आपल्याला हवा असाच लावला आहे. ब्राम्हणी वर्चस्वाला कोठे हि धक्का न लागू देण्याचा प्रयत्न येथे केला आहे. आर्यांच्या म्हणण्यानुसार ब्राम्हण, क्षत्रिय, आणि वैश्य यांना वेदोक्ताचा अधिकार आहे. शूद्रांना मात्र पुराणोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याचा अधिकार आहे. शुद्र म्हणजे अनार्य होय.

राजर्षी शाहू महाराज, बापूसाहेब घाडगे, मामासाहेब खानविलकर, राजारामशास्त्री भागवत हि लोक ऑक्टोबर १८९९ मध्ये पंचगंगा नदीवर स्नान करण्यासाठी गेले होते. धार्मिक विधी करण्यासाठी त्यांच्या सोबत नारायण भटजी देखील होते. नदीवर नारायण भटजीने वेदोक्त मंत्र म्हणण्या ऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. हि बाब राजाराम शास्त्री भागवत यांच्या लक्षात आली. कोल्हापूर संस्थानचे राजे असून देखील

ISSN No. 2394-5990

येथे पुरोणोक्त मंत्र का हा मोठा प्रश्न सर्वानाच पडला होता. राजर्षी शाहू महाराज यांनी या सबंधी विचारणा नारायण भटजी यांच्याकडे केली. त्यांनी उत्तर दिले कि 'आपण शुद्र आहात आणि शूद्रांना फक्त पुराणोक्त मंत्र म्हणावयाचे असतात.'[२] नारायण भटजीना असे म्हणावयाचे होते कि महाराज हे क्षत्रिय नाही. 'आपण शुद्र नाहीत तर क्षत्रिय आहोत.'[३] ''मग 'क्षत्रियकुलावतंस' ही आमची बिरुदावली आहे, त्याचे काय?''[४] असे महाराज नारायण भटजींना म्हणाले त्यावर नारायण भटजी म्हणाले ''ब्राम्हण जोपर्यंत वर्ग तुम्हाला क्षत्रिय म्हणून मान्यता देत नाही तोपर्यंत तुम्ही शूद्रच आहात.''[५] म्हणजे कोण क्षत्रिय, कोण शुद्र हा ठरविण्याचा अधिकार देखील ब्राम्हणांना होता कि काय असा मोठा प्रश्न पडतो. 'जरी ब्राम्हण झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ' अशी भूमिका मात्र ब्राम्हणांसाठी होती. शाहू महाराजांचे कार्य श्रेष्ठ असून देखील त्यांना हे सांगावे लागले कि मी क्षत्रिय आहे आणि मी क्षत्रिय असल्यामुळे आपल्या घरातील धार्मिक विधी व संस्कार हे पुराणोक्त मंत्रा ऐवजी ते वेदोक्त मंत्रांनीच झाले पाहिजे या भूमिकेवर शाहू महाराज ही ठाम होते. यातूनच उभे राहिले ते म्हणजे वेदोक्त प्रकरण.

एका राज्याचा छत्रपतीस जर शुद्र म्हणून राहावे लागत असेल, ब्राम्हणांच्या वर्चस्वाखाली राहावे लागत असेल तर सर्व सामान्य लोकांची काय परिस्थिती असेल याची कल्पना येते. राजर्षी शाहू महाराज यांच्या घरातील धार्मिक विधी करण्याचा अधिकार आप्पासाहेब राजोपाध्ये यांचा होता. त्यासाठी त्यांना वार्षिक ३०००० रुपयांचा इनाम देखील मिळत होता. छत्रपतींच्या कडे एक प्रकारे नोकरीस असून देखील त्यांनी राजघराण्यातील धार्मिक विधी करण्यास नकार दिला कारण त्यांना राजर्षी शाहू महाराज हे क्षत्रिय आहे हे त्यांना मान्यच नव्हते. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी १६ मे १९०२ रोजी राजोपाध्ये यांना नोकरीवरून काढून टाकले आणि फक्त नोकरीच नाही तर त्यांना दिलेले वतन देखील जप्त करून घेतले. एक प्रकारे हा निर्णय घेऊन महाराजांनी प्रस्थापित समाज व्यवस्थेतील समाज कंटकांना धडा शिकविण्याचा पहिला निर्णय घेतलेला पहावयास मिळतो. नंतर राजोपाध्ये यांनी आपली नेमणूक रद्द करून आपले इनाम जप्त करण्याचा फेरविचार करावा अशी मागणी शाहूकडे केली. महाराजांनी ती फेटाळली. आणि ती फेटाळणे अगदी बरोबरच होते. या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी राजोपाध्ये यांनी संस्थानातील प्रतिनिधी फेरीस्ता, मुंबई सरकार, आणि व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनकडे तक्रार केली. परंतु सर्वानीच त्याचा अर्ज फेटाळला. अर्ज फेटाळून ब्रिटीशांनी शाहू महाराजांनी सुरु केलेल्या समाज प्रबोधनाच्या चळवळीला एकप्रकारे सहकार्यच केले. या वेदोक्तो प्रकरणात आपल्याला सहकार्य मिळावे म्हणून राजोपाध्ये यांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर कर्नाटक मधील ब्राम्हण वर्ग संघटीत करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काहीही परिणाम झाला नाही. आर्य कालखंडापासून चालत आलेल्या ब्राम्हणांच्या वर्चस्वाला, त्यांच्या अधिकाराला शह देण्याचे काम शाहू महाराजांनी केलेले पहावयास मिळते. कारण या समाजव्यवस्थे मध्ये स्वतःला श्रेष्ठ समजणारा हा वर्ग सत्तेच्या, अधिकारांच्या जोरावर सर्व सामन्य अशा लोकांची लुट करीत होता. समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ट, रूढी, परंपरा चालीरीती यामध्ये उच्चवर्णीयांचा हातभार मोठा होता. त्यांनीच याला खतपाणी घालण्याचे काम केले होते.या वेदोक्तो प्रकरणामुळे पुरोहितशाहीची समाज जीवनावरील पकड काहीशी कमी झालेली पहावयास मिळते. ''राजर्षी शाहू महाराज यांच्या बाबतीत घडलेल्या या प्रकरणामुळे कोल्हापूरच्या वातावरणात एक नवा उत्साह निर्माण झालेला पहावयास मिळतो. यातूनच ब्राम्हेत्तर चळवळीला मोठी चालना मिळाली. कोल्हापूरचे लोक कोठे हि गेले तरी तेथे ही ब्राम्हेत्तर चळवळीची नवे केंद्रे निर्माण करीत असे. यातूनच काही वर्षातच ब्राम्हेत्तर चळवळ निर्माण झाली असे म्हणण्यास हरकत नाही.''[६] राजर्षी शाहू महाराज यांना खर तर जाती व्यवस्था ही मुळा पासूनच नष्ट करावयाची होती. कारण जाती व्यवस्था ही समाजाला लागलेली कीड आहे. आणि ते नष्ट करणे गरजेचे ही होते. आणि तत्कालीन ब्रिटीश कायद्याच्या आधारे ते शक्य देखील होते. वेदोक्तो प्रकरणाच्या माध्यमातून प्रस्तुत समाज व्यवस्थेला तडा देण्याचे काम शाहू महाराजांनी केले. मात्र त्यांना देखील अनेक ब्राम्हणी नेत्यांशी वैचारिक संघर्ष करावा लागला होता. आणि तो संघर्ष होणे देखील सहाजिकच होते. या वादात लोकमान्य टिळकांनी देखील उडी घेतली परिणामी धार्मिक आणि सामाजिक प्रश्ना मधून सुरु झालेल्या या प्रश्नाला पुढे जाऊन राजकीय वळण लागल्याचे दिसून येते.लोकमान्य टिळकांनी केसरी मधून २२ ऑक्टोबर १९०१ मध्ये ''वेदोक्ताचे खूळ –१''[७] अशा आशयाचा एक अग्रलेख लिहिला. धनंजय कीर लिहितात 'टिळकांच्या वेदोक्ता वरील संकुचित अनुदार मते प्रतिपादित करणाऱ्या केसरी वृत्तपत्रा वरील लेखामुळे ब्राम्हणेतर वर्गात मोठा असंतोष निर्माण झाला होता. तसे पहिले तर आर्य काळापासूनच समाज हा वर्ण व्यवस्था नंतरच्या काळात जातीव्यवस्था यात विभागलेला होता.

वेदोक्तो प्रकरणामुळे सर्वात महत्वाची घटना घडली ती म्हणजे मराठा समाज जागा झाला. मुळातच वेदोक्त प्रकरण हे ब्राम्हण व क्षत्रिय या दोघात श्रेष्ठ कोण यासाठी चाललेला तो वाद होता. ''वेदोक्ताच्या वादात राजर्षी शाहू महाराज यांचा विजय झाला. धार्मिक विधी करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी रोख वेतन स्वरूपात पंडितांची नियुक्ती केली. आप्पासाहेब

राजोपाध्ये यांच्या जागी तात्याराव जोशी यांची २५० रुपये वेतनावर नियुक्ती केली होती.''[८] नारायण भट सेवेकरी यांच्याकडून १९०१ मध्ये वेदोक्त पद्धतीने श्रवणी करून घेतली. राजर्षी शाहू महाराज एवढ्यावरच न थांबता महाराजांनी क्षात्रजगद्गुरु चे नवे पीठ निर्माण केले आणि त्यावर मराठा जातीच्या सदाशिव बेनाडीकर यांची नेमणूक केली. धार्मिक विधी करणे हा कोणा एका जातीची मक्तेदारी नाही, तो अधिकार सर्वांना आहे. ब्राम्हणांनीच नाही तर क्षत्रिय, वैश्य, शूद्र वर्णातील वेगवेगळ्या जातीतील लोकांना देखील धार्मिक विधी करण्याचा अधिकार निर्माण व्हावा, धार्मिक विधी करता यावेत यासाठी पुरोहितांची शाळा शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सुरू केली. पुरोहितांची शाळा काढणारे कोल्हापूर संस्थान हे भारतातील पहिलेच संस्थान होते. वर्षानुवर्ष चालत आलेली ही परंपरा बदलविण्याचा आणि समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे काम महाराजांनी येथे केले. कारण ब्राम्हण सर्व-सामान्यांची कशी लूट करत होते हे आपल्याला प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वाङ्मयातून देखील येथे समजून येतो.

थोडक्यात राजर्षी शाहू महाराज यांच्या स्वतःच्या संदर्भात सुरू झालेले, स्वतःच्या क्षत्रियत्वाच्यावर निर्माण केलेल्या प्रश्नाला उत्तर शोधण्यासाठी ही चळवळ सुरू केली. मात्र एका संस्थानात निर्माण केलेल्या प्रश्नाला उत्तर शोधण्यासाठी ही चळवळ सुरु केली. मात्र एका संस्थानात निर्माण झालेला हा संघर्ष काही वर्षानंतर थांबला असे नाही. केवळ धार्मिक मुद्द्यावरच हे प्रकरण येऊन थांबले असेही नाही. या प्रकरणातून समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा, विचार मंथन व्हायला सुरुवात झाली. वेदोक्त प्रकरणाचा आणि ब्राम्हेत्तर चळवळीचा जवळचा संबंध होता. ''सत्यशोधक चळवळ ही धार्मिक सुधारणा चळवळ होती तर ब्राम्हेत्तर चळवळ ही राजकीय चळवळ होती.''[९] असे मानले जात असले तरी समाजातील ब्राम्हण वर्चस्वाला शह देऊन समाजातील अनिष्ट प्रथावर काम ब्राम्हेत्तर चळवळीने केलेले पहावयास मिळते. राजर्षी शाहू महाराज यांचा मोठा अपमान या प्रकरणांमध्ये झाला होता. त्याचा परिणाम म्हणजे विखुरलेला बहुजन समाज एक होण्यासाठी देखील हे प्रकरण महत्वाचे ठरलेले होते. एकंदरीत विचार केला तर असे दिसून येते की त्या काळात कोल्हापूर नगरपालिका ब्राम्हणमय असताना, पंचगंगेवर ब्राम्हणासाठी वेगळा घाट असताना म्हणजेच एवढे वर्चस्व ब्राम्हणांचे असताना वेदोक्त प्रकरणामुळे कोल्हापुरात ब्राम्हणांचे वर्चस्व कमी होऊन सर्वसामान्यांना अधिकार मिळाला. मात्र राजर्षी शाहू महाराजांनी जरी पुरोहित निर्माण करण्यासाठी पुरोहितांची शाळा काढली असली तरी आजही धार्मिक विधी पूजा-अर्चा हे ब्राम्हण वर्गच करताना दिसून येतो. सर्व समाज शिकून देखील धार्मिक विधीच्या अधिकारावर त्यांचीच मक्तेदारी पहावयास मिळते. मग आपण महाराजांचे विचार विसरलो की वेदोक्त प्रकरण हा मोठा प्रश्न पडतो.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. गाठाळ एस.एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्र. ३७६
२. कित्ता पृ क्र.३७६
३. कित्ता पृ क्र.३७६
४. पवार शि. राजर्षी शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे,पृ क्र.४१
५. गाठाळ एस.एस., आधुनिक महराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्र. ३७६
६. लट्ठे आ.बा. श्री छत्रपती शाहू महराज यांचे चरित्र, वरदा प्रकाशन पुणे पृ.क्र.२२०
७. पवार शि. राजर्षी शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे,पृ क्र.४३
८. कित्ता पृ क्र.४२
९. फडके य.दी. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन पृ.क्र.१९२-९३


■■■